
# लोकसाहित्य :

## काल, आज आणि उद्या...

संपादक

डॉ. रामशेट्टी शेटकार

प्रा. बालाजी शिंदे



# LOKSAHITYA : KAAL, AAJ AANI UDYA...

**लोकसाहित्य : काल, आज आणि उद्या...**

**संपादक :** डॉ. रामशेट्टी शेटकार
प्रा. बालाजी शिंदे

**ISBN 978-93-5240-017-1**

**अरुणा प्रकाशन**
**१०३, ओमकार कॉम्प्लेक्स - अ,**
**खर्डेकर स्टॉप, औसा रोड, लातूर**
**मो. ९४२१४८६९३५, ९४२१३७१७५७**

© **सर्व हक्क संपादकाधीन**

**: प्रथमावृत्ती :- १२ नोव्हेंबर २०१५ (दीपावली पाडवा)**

**: मुद्रक :** आर्टी ऑफसेट, लातूर

**अक्षर जुळवणी :** महेश देशपांडे

**मुखपृष्ठ रेखाटन :-** वीरु गुळवे (मो. ८६००८८११२७)

**मूल्य : ६००.०० रुपये**

* **'लोकसाहित्य : काल, आज आणि उद्या...' या पुस्तकातील सर्व मते आणि अभिप्राय संबंधित लेखकांची असून त्या संबंधी प्रकाशक, मुद्रक व वितरक सहमत असतीलच असे नव्हे.**

५५. बंजारा 'तिज' उत्सवातील लोकगीतातून व्यक्त होणारी भावात्मकता - प्रा. प्रमोद आडे / ४६५
५६. गोरबंजारा : होळीगीतातील आशयसौंदर्य - प्रा. रावसाहेब चव्हाण / ४७०

## भाग ११ : लोकप्रायोज्य कला

५७. फुगडी क्रीडानृत्य प्रकारातील प्रतीकात्मकता - डॉ. वैशाली भालसिंग / ४७७
५८. लोकसाहित्यातील लोककलाप्रकार - प्रा. भाऊसाहेब गव्हाणे / ४८३
५९. मराठी लावणीचे पारंपरिक व आधुनिक स्वरुप - डॉ. दिलीप कसबे / ४८९
६०. तमाशा वगनाट्याचे व रंगभूमीचे स्वरुप - डॉ. भरत देशमुख / ४९४
६१. आंबेडकरी जलसे : समाजप्रबोधन लोकनाट्याचा नवा आविष्कार - डॉ.अशोक नारनवरे / ५००
६२. लोकसंस्कृतीतील शक्तिदैवत : मायक्कादेवी - प्रा. किसन माने / ५१९
६३. लोकसाहित्यातील लोककलांचे कलात्मक सौंदर्य - डॉ. दुष्यंत कटारे / ५२७
६४. गोंधळ्याचे मूळ उपास्य दैवत - डॉ. ज्ञानदेव राऊत / ५३३
६५. जागरण : स्वरुप व विशेष - प्रा. शिवाजी परळे / ५३६
६६. पोवाडा लोककलाप्रकार : स्वरुप आणि वाटचाल - प्रा. श्रीकांत मुद्दे / ५४७
६७. लोकसंस्कृतीच्या उपासनेचे पाईक - डॉ. दैवत सावंत / ५५८
६८. लोकवाङ्मय : संस्कृती जतन करणारी परंपरा - प्रा. बाळासाहेब गायके / ५६३
६९. लोकसाहित्यातील काही कलाप्रकार - डॉ. जुल्फी शेख / ५६६
७०. लोकसाहित्याचे अभ्यासक्षेत्र व लोकदैवतांचे बदलते स्वरुप - डॉ. आनंद भंडारे / ५७२
७१. खानापूर तालुक्यातील ग्रामदैवते : एक अभ्यास - प्रा.मधुकर काळबागे / ५७६

## भाग १२ : लोकसाहित्यातील म्हणी व उखाणे

७२. म्हणी : मौखिक लोकसाहित्यातील अविभाज्य घटक - डॉ. गोविंद काळे / ५८२
७३. लोकम्हणीतला देव : एक विवेचन - डॉ. शंकरानंद येडले / ५८६
७४. लोकजीवनातील म्हणींचे स्थान - प्रा. शिवसांब कापसे / ५९०
७५. लोकम्हणीचे स्वरुप-विशेष - प्रा. मारोती कसाब / ५९३
७६. मराठी म्हणी - प्रा.आर.एस. बडूरे / ५९८
७७. उखाण्याचे वाङ्मयीन अवलोकन - डॉ.चंद्रकांत बाकेवाड, डॉ. विठ्ठल जंबाले / ६०१
७८. उखाणे : स्वरुप आणि प्रकार - प्रा. विद्या कांबळे / ६०८

७७

# उखाण्याचे वाङ्मयीन अवलोकन

डॉ.. चंद्रकांत बाकेवाड, डॉ. विठ्ठल जंबाले

लोकसाहित्यातून समाजदर्शन घडविण्याच्या अनेक आविष्कार पध्दती आहेत.लोकमानसाच्या कृतीआणि उक्तीचा आविष्कार लोकसाहित्यातून घडतो. यातील उक्ती अर्थात लोकोक्तीमध्ये उखाणे हा घटक समाविष्ट होतो. परंपरागत लोकजीवनाचा कलात्मक शाब्दाविष्कार म्हणजे लोकवाङ्मय यास मौखिकाविष्कार म्हणतात. यामध्ये लोकगीत, लोककथा, लोककथागीत, उखाणे, म्हणी आणि वाक्प्रचार हे ठळक शाब्दाविष्कार अंतर्भूत आहेत. यातील उखाण्याचे लोकजीवनातील स्थान आगळेवेगळे असून समृध्द आणि संपन्न आहे. उखाण्यामध्ये ज्ञान, मनोरंजन आणि विनोदाची खाण खचाखच भरलेली आहे. प्राचीन काळापासून मौखिक परंपरेने चालत आलेला लोकजीवनाचा अविभाज्य भाग बनलेला व आनंदाचा प्रत्यय देणारा उखाणा हा प्रकार आजही टिकून आहे. खेळताना वा लग्नादी कार्यात रचून म्हटलेल्या ठुमकेदार तुकडयास 'उखाणे' म्हणतात. यातून विशेषत: स्त्रीजीवनाशी निगडित लोकाविष्कार घडतो. स्त्रियांच्या भावभावनांची वाट मोकळी करण्याचे एक माध्यम बनते. झिम्मा-फुगडी, कोंबडी-पिंगा खेळताना खेळाची लय पकडताना उखाण्याच्या रचना सहजस्फूर्तपणे साकारतात. त्यामध्ये अर्थाला प्राधान्य नसते. तसेच जोडीदारणीची थट्टा करणे हा उद्देश असतो . म्हणून उखाण्यातून सवाल-जवाबाचे रुप आलेले दिसते. संक्रात, मंगळागौर, दिवाळी या सणाच्या निमित्ताने तसेच लग्नात वधू-वर, व्याही-व्याहीण आणि बारशाच्या कार्यक्रमात तथा विहीण-विहीण, करवल्या यांच्यामध्ये उखाण्यातून नाव घेण्याची प्रथा आहे, त्या पाठीमागे परस्परांची थट्टा-मस्करी करणे हाच प्रांजळ हेतू असतो. सूचक शब्दातून खोचक टोमणे मारण्याचे कार्य उखाण्याद्वारे केलेले दिसते.

'उखाणा' हा भाषेतील अनमोल रत्नाची खाण,विनोदाचे भांडार असून अतिशय श्रवणीय, खमंग-मसालेदार लोकवाङ्मयप्रकार आहे. उखाण्यामध्ये गद्य आणि पद्याचे मिश्रण असते. हे मिश्रण ऐकणाऱ्यांना पटकन आकर्षित करते, त्यात बोध आणि रंजनाचा सुंदर मिलाफ घडलेला असतो. शब्द चमत्कृतीमुळे हा रचनाप्रकार परंपरागत लोकजीवनात विशेष लोकप्रिय आहे. विशिष्ट प्रसंगी मनात साठविलेल्या भावभावना मोजक्या शब्दात ठसठशीतपणे व्यक्त करण्याचे माध्यम म्हणून लोकवाङ्मयातील उखाणे या रचनाप्रकाराकडे पाहता येते. उखाण्यामधून कधी भव्य-दिव्य विचार प्रकट होतात तर कधी थट्टा-मस्करी आणि मिस्किल विनोद साधून गालावर खळी पाडणे अथवा ऐकणाऱ्या व्यक्तीला कोड्यात टाकण्याचे आश्चर्य व्यक्त होते.

**उखाण्याचे पर्यायी शब्द :-**

मराठीमध्ये कूट, प्रहेलिका, कोडे, प्रश्न, ब्रह्मोद्य, आयना, आहना असे उखाण्यासाठी शब्द रूढ आहेत, याशिवाय विविध जातीजमातींत प्रतिशब्द वापरले जातात. कोहडा, उमाण, हुमाण

हे प्रतिशब्द योजतात. वारली जमातीत कुलगंडे हा शब्द वापरात आहे. याशिवाय उखाणो (गुजराती), उखाणी (सिंधी), पहेली (हिंदी व बंगाली), ओगणु (कानडी), करसाळ (गोंड), विडिकदाई (मल्याळम, तामीळ) याशिवाय दोन्ही भाषेत उखाण्यासाठी पर्यायी शब्द आढळतात. उदा. आहोणा, भुलभुलैया, बुझौवल इत्यादी. भारतामध्ये जवळ-जवळ सर्वच प्रांतातील लोकजीवनात उखाणा प्रचलित आहे, हे वरील उल्लेखावरुन लक्षात येते. परंपरागत लोकजीवनातील ज्ञान आणि मनोरंजनदृष्ट्या रचनेची वेगळीक दर्शविणारा उखाणा हा आगळा प्रकार लक्षात घ्यावा लागतो. आशय-विषय आणि रचनादृष्ट्या उखाण्याचे विभिन्न स्वरुप आपल्यासमोर येते.

**उखाण्याचे प्रयोजन :-**

उखाण्यातून संस्कृती सातत्य टिकते. समाजमनाच्या आविष्काराचे माध्यम म्हणून उखाण्याचा उपयोग केला जातो. उखाण्यात मनोरंजनाचा खजिना साठविलेला असतो. सामाजिक संस्थामध्ये उखाण्याला अनन्यसाधारण महत्त्व आहे. उदा. कुटुंब, विवाह. त्याचबरोबर उखाण्यातून विधीप्रसंगी धर्म संस्कृतीचे पालन केले जाते.

**उखाण्याची परंपरा :-**

भारतामध्ये उखाण्याची परंपरा प्राचीन असून त्याचा मागोवा घेताना आपणास वेदकाळापर्यंत जाता येते. वेदातील 'ब्रह्मोद्य' असा शब्द उखाणा निदर्शक आहे. यावरुन वेदकाळात उखाणे अस्तित्त्वात होते, असे सिद्ध करता येते. ब्रह्मोद्य म्हणजे ब्रह्माला किंवा आध्यात्मिक प्रश्नाला अनुलक्षून केलेली उक्ती. ब्रह्मोद्यात दोन बाजूची प्रश्नोत्तर स्पर्धा होत असते. [१] म्हणजेच ब्रह्मोद्य हा प्रश्नोत्तर स्वरुपाचा उखाणा प्रकार दिसतो. एखाद्याने विचारलेल्या प्रश्नाचे उत्तर उखाण्यातूनच देणे आणि संबंधिताला शेवटी प्रश्न विचारणे याच्याशी निगडित ब्रह्मोद्य हा रचनाप्रकार वेदकाळात रुढ होता. अलीकडील कलगीतुरा या वाङ्मयीन विनोदी रचनेशी साधर्म्य दर्शविते. ब्राह्मणग्रंथ, उपनिषदे यामध्ये उखाणा 'विवाद' या नावाने आल्याचे दिसते. तसेच महाभारतातील वनपर्वात यज्ञाने युधिष्ठिराला विचारलेल्या प्रश्नांचे स्वरुप उखाण्यासारखेच आहे. यक्ष व युधिष्ठिर यांची कुटात्म प्रश्नोत्तरे जातकातही आढळतात.[२] बौद्ध त्रिपिठिक, जैनआगम वाङ्मय अथवा इतर धार्मिक ग्रंथात प्रवल्हिका अर्थात प्रहेलिकाच्या स्वरुपात उखाणे आढळतात. डॉ. शरद व्यवहारे यांनी मूळ अर्थ लपविण्यासाठी दुसरा कोणतातरी अर्थ व्यक्त करावयाचा असा आतला एक व बाहेरचा एक असे दोन अर्थ व्यक्त करणारा प्रहेलिका हा प्रकार सांगितला आहे. [३] यावरून उखाण्याची परंपरा प्राचीन असून प्रहेलिकेचा उपयोग खेळात चतुरपणाने करुन विद्वानांच्या संवाद बैठकीत पुष्कळ लोक एकत्र बसलेले असताना केलेला रहस्यलाप त्यात आढळतो.उखाण्याचे दोन भागात वर्गीकरण करता येते. १. प्रश्नोत्तर उखाणे २. प्रश्नोत्तरविरहित उखाणे. प्रश्नोत्तर स्वरुपाच्या उखाण्यात कोडी, कूट, ब्रह्मोद्य, प्रहेलिका याचा समावेश केला जातो. तसेच प्रश्नविरहित उखाण्यामध्ये नाव घेण्याचे उखाणे, विविध समारंभातील, खेळातील उखाणे, आहणा, आयना या सदरातील रचना समाविष्ठ होते.



**उखाण्यातील कल्पनासौंदर्य :-**

लोकसाहित्यामध्ये निरक्षरांनी निर्माण केलेले आणि एका पिढीपासून दुसऱ्या पिढीपर्यंत मौखिक परंपरेने चालत आलेले उखाण्याचे भांडार समृद्ध आहे. या उखाण्यामध्ये निरक्षरांच्या कल्पनाविलासाचे अप्रतिम स्वरुप पाहवयास मिळते. परंपरा आणि कल्पना यांचा सुंदर समन्वय वास्तवतेशी जोडून कल्पकतेच्या बळावर रसिकांना मोहित करण्याचे कौशल्य उखाण्याच्या कल्पनाबंधात दिसते. उदा. वेरुळची शिल्पे आहेत अप्रतिम सुंदर

......... साथीने संसाररुपी मंदिर.

किंवा

चांदीचा ताट लड्डू भरले काठोकाठ

...... राव बसले जेवायला समया लावले तीनशेसाठ.

किंवा

सागराला आली भरती नदीला आला पूर

............च्या प्रेमासाठी आईवडील केले दूर.

वरील उखाण्यातून लोकजीवनातील कल्पनाविलासाच्या ठळक बाबी निदर्शनास येतात. त्यातील कल्पनासौंदर्यातून चांदीचे ताट ही कल्पना रंगवताना पतीदेवाच्या ऐश्वर्याची कल्पना केलेली दिसते. तसेच सागर, नदी या प्रतिमा योजून मानवी जीवनातील सहजभाव अभिव्यक्त झालेला आहे. सभोवतीच्या प्रतिमांना कल्पकतेच्या बळावर पकडून सजीवत्व देताना नेमका भावार्थ प्रकट करण्याचे लोकजीवनाची आगळीच रीत उखाण्यातील रचनाबंधात आढळते. अशा कल्पनाविलासाच्या अनंत गोष्टी उखाण्यामध्ये साठविलेल्या दिसतात.

**उखाण्यातील पौराणिकता :-**

हजारो वर्षापासून चालत आलेल्या धार्मिक रीतीरिवाजाचे पौराणिक संदर्भ उखाण्यामध्ये साठविलेले आहे. रामायण, महाभारत व प्राचीन धर्मग्रंथातील प्रतिमा निवडून किंवा घटनाप्रसंगांशी निगडित पौराणिक संदर्भातून घेऊन उखाणे जन्माला आलेले दिसतात.

उदा. "राजा हरिश्चंद्र रोहिदास पुत्र

......च्या गळयात बांधले मंगळसूत्र.

किंवा

यमुनेच्या तीरावर कृष्ण वाजवितो पावा

.......रावाचे नाव घेते तुमचा आशीर्वाद हवा.

किंवा

महादेवाच्या पिंडीवर वाहते जवस

...... नाव घेते संक्रातीचा दिवस.

किंवा

सर्व देवांमध्ये श्रेष्ठ ब्रह्म-विष्णू-महेश
...... रावाचे नाव घेऊन करते गृहप्रवेश.

किंवा

पांडुरंग माझे गुरु प्रमोदिनी माझी विठाई
..... च्या बाळाची झाले मी ग आई

किंवा

रामाने आणले रामफळ सीतेने आणले सीताफळ
लक्ष्मणाने आणले चुडे ..... नाव घेते सर्वांच्या पुढे."[४]

वरील वधू-वर उखाण्यातून नावे घेताना कृष्ण, राम,सीता , पांडुरंग, विठाई अशा पौराणिक उपमा दिलेल्या दिसतात. या पौराणिक प्रतिमांचा वापर वास्तव जीवनातील संसारात साहचर्य करणाऱ्या पतीराजाशी तुलना करताना झालेला आहे. ही प्रतिमा, प्रतीके अत्युच्च कल्पनाशक्तीचा प्रत्यय देतात. साधारणतः भारतीय संस्कृतीमध्ये हिंदू धर्मात पतीला देव समजले जाते आणि पत्नी अर्धांगीणी असून तिने आयुष्यभर मनोभावे पतीची सेवा करावी, अशी परंपरा रुढ झालेली आहे. या परंपरेला अनुसरुन पती-पत्नीची विविध देवदेवतांशी तुलना करण्याची प्रथा आहे, याचे प्रत्यंतर उखाण्यामधून घडते.

**सांस्कृतिकता:-**

उखाण्याची परंपरा निर्माण होणे, तिचे प्रचलन घडणे आणि विशिष्ट प्रसंगी उपयोजन करणे यामागे सांस्कृतिक संदर्भ दडलेले आहेत. रुढी-परंपरेने भारतीय जनमनावर अनेक गोष्टींचा पगडा कायम आहे. यामध्ये विवाहप्रसंगी अथवा अन्य कार्यक्रमाच्या निमित्ताने पती-पत्नीनी नाव घेण्याची प्रथा रुढ झालेली आहे. याबाबतीत सांस्कृतिक संदर्भ कारणीभूत असून पती-पत्नीने एखाद्या कार्याच्या प्रसंगी एकमेकांची नावे घेत असताना ती उखाण्यात घेतली पाहिजेत अन्यथा फक्त नाव घेतले तर आपल्या जोडीदाराचे आयुष्य घटते अशी भावना रुढीने लोकमनावर बिंबविलेली आहे, याबाबत परंपराच कार्यरत आहेत. काही उदाहरणे खालीलप्रमाणे -

१) सोन्याचे मंगळसूत्र सोनाराने घडविले
.......रावाचे नाव घेण्यास मैत्रिणीने अडविले.

२) काढणीत काढणी तुरीची
अवघड पायरी विहरीची
भाकरी घेऊन न्याहरीची
.... ला चोळी शिवतो जरीची.

३) को-या घागरीत लिंबाचा खार
.......... च्या गळयात मोत्याचा हार



पत्नी सौंदर्य खुलण्यासाठी पुरक ठरणाऱ्या अलंकार, वस्तूची योजना आणि पतीचे मोठेपण सिध्द करण्यासाठी उपयुक्त ठरणारे प्रतीके ग्रामसंस्कृतीची दर्शन घडवितात. वरील उखाण्यातून नातेसंबंधातील कोमलता, आदरभाव आणि संस्कृतीने चालत आलेल्या मूल्यांचा उल्लेख दिसतो. कृषिसंस्कृतीतील संदर्भ आणि निसर्गप्रतिमा याचा अचूक वापर उखाण्यामध्ये केलेला दिसतो.

**रंजनपरता -विनोद :-**

व्यवहारज्ञान, व्यवसाय कौशल्य, धार्मिकतेचे महत्त्व विशद करताना आलेल्या उखाण्याचा विनोदी आविष्कार घडतो. लग्नात मानापानाच्या प्रसंगी थट्टामस्करी करताना या उखाण्याचा उपयोग केला जातो.

१) आला आला रुखवत
दणाणली आळी !
उघडून पाहिलं तर
दीड पोळी

२) समोर होता कोनाडा त्यात होता पेढा
मैनीला नाही कळलं तिचा नवरा होता येडा
नवरा होता येडा, बाई नवरा होता येडा
त्याला आवडे लांडया शेपटीचा गोंडा

वरील प्रकारच्या उखाण्यातून लग्नप्रसंगी वधुकडील मंडळीची आणि खेळामध्ये मैत्रिणीची थट्टामस्करी केली जाते.

**रहस्यमयता व नवलपूर्णता :-**

कोडी, कूट आणि प्रश्नार्थक उखाण्यात गुढ अथवा गोपन दडलेले असते.

१) असाला मसाला तीन तोंड कशाला ?.................
शंख फुंकला सडा शिंपला दशरथ राजा घसरत आला ?..............

अशाप्रकारच्या उखाण्यातून रहस्यमयतेचा प्रत्यय येतो आणि नवल आश्चर्य व्यक्त झालेले दिसते.

**परिवर्तनशीलता :-**

परिस्थितीचे बदलते पडसाद उखाण्यामधून उमटलेले दिसतात.

लहान मोठे दोन पाय बारा गावी करते कहर ? ...................
मोठा चाले सात खेडी लहान चाले एक शहर ? .....(घडयाळ )

वरील उखाण्यातून काळानुरुप परिवर्तनाचे संदर्भ आढळतात.

**प्रादेशिक संदर्भ किंवा स्थल निर्देश:-**

"विदर्भात आहे झाडी दाट, कोकणात पिकतो भात
........... च्या संगतीत दिवस जाते आनंदात "

अशाप्रकारच्या उखाण्यातून कोकण, विदर्भ, मराठवाडा प्रदेशाचे अथवा इतर स्थळाचे निर्देश येतात. त्याप्रदेशाचे भौगोलिक स्थान आणि सांस्कृतिक वैभव यासंबंधीचे चित्रण येते.

**व्यंग्यात्मक उखाणे :-**

मानसिक व्यंग्य, शारीरिक व्यंग्य तथा एखाद्या सामाजिक व्यंग्यावर मार्मिकपणे टीका-टिप्पणी करण्यासाठी उखाणा वापरला जातो.

समोर होता कोनाडा त्यात होता आना,
ठकीला नवरा भेटला बाई कान्हा
असा नवरा लई शहाणा बाई लई शहाणा
का ग ठके त्याच्याकडं जाईना

या उखाण्यातून परस्परांचे व्यंग्य पकडून थट्टामस्करी साधलेली दिसते. एकमेकांचे वर्म काढून प्रश्नोत्तरातील वरचढपणाची व्यंग्यात्मक पातळीवर नोंद आढळते.

**काव्यमयता-लयबध्दता :**

उखाण्याचा रचनाबंध मुळातच काव्यात्मक असतो. सुरात गाता येईल अशी गायनानुकूल लयबध्द स्वरुपाची रचना उखाण्यातून चालत आलेली आहे. कवितेमध्ये पोषक ठरणारे बहुतांश घटक उखाण्यामध्ये सापडतात.

आला आला रुखवत त्यात होता गोंडा
विहीणबाईला बसायला द्या धोंडा

या उखाण्यामध्ये गोंडा, धोंडा या प्रतिमाचा यथोचित वापर केलेला असून यमक-अनुप्रासानुकूल रचना उखाण्यातील रंजकता वाढविते.

**गद्य-पद्यमिश्रित रचना :-**

प्रश्नस्वरूपाच्या उखाण्यात वेगळेपण पाहवयास मिळते.

दिवसा ढवळया मुक्काम करतो रात्री बाहेर निघतो,
कोण असा फिरे प्रवासी, दिवा बांधून ढुंगणाला ?...........

या रचनेतून गोपन उलगडण्यासाठी गद्य आणि पद्यमिश्रित रचना साकारली आहे. या गद्य-पद्य रचनेतून ऐकणाऱ्याला जिज्ञासा वाढविणाऱ्या कोडयातून प्रश्न विचारले जातात.

**खटकेबाजपणा :-**

रुखवताच्या प्रसंगी योजलेल्या उखाण्यामध्ये खटकेबाज संवाद साधले जातात. या संवादात विनोदी पद्धतीने रसपरिपोष मिळविण्यास ते उपयुक्त ठरते. उखाण्याचे मिस्किल स्वरुप व्याही आणि विहिणीच्या परस्परांशी थट्टा-मस्करी करीत हास्याचे तुषार उडविण्याच्या पलिकडे जात नाही.

आला आला रुखवत त्यात होती नोट
विहीणबाई मागते पँट आणि कोट



याच उखाण्यात अश्लीलता धारण केलेली दिसते.

अरकराची नथ तिला परकराचा दाणा
इवाई म्हणतो विहीणबाई पंलगावरती याना

त्यावर विहीणबाई म्हणते- येते दादा येते, पण फजितीला भिते.

अशाप्रकारे संवादाच्या पातळीवर विनोदाची झालर जोडून हास्याचे फवारे निर्माण करणारा संदर्भ उखाण्यामध्ये दडलेला असतो.

**उपहासात्मकता :-**

एखाद्याचे वैगुण्य दर्शविण्यासाठी उपहास-विसंगती सूचक टिप्पणी केलेली दिसते. थट्टा - मस्करीच्या पातळीवरील ही टिप्पणी कधीकधी उपरोधाच्या स्तरावर पोहचते. असे संयतशील वर्णन उखाण्यात प्रचलित आहे.

मांडवाच्या दारी पडलं टिपरं
विहीणबाईला झालं पोरं झिपरं

असे व्याहिणीच्या झिपऱ्या मुलाचे विडंबन रंगविताना खमंग विनोद आविष्कृत होतोच.

असू द्या दादा ! रात्री निजाया गेली होती
तेव्हा नवऱ्याला आलं फेफरं ! तेव्हा पोरं झालं झिपरं

असे गालाला खळी पाडणारे आणि गीतातील सांकेतिक अश्लीलता सूचित करणारे शारीरिक, सामाजिक व्यंग्याचे व जीवनातील विसंगतीचे सूचक प्रसंग वर्णन करणारे उखाणे लोकसाहित्याचा अविभाज्य भाग आहेत.

उखाण्यात आपणास सार्वकालिकता, क्रियासंबंद्धता, बोलीभाषेत केलेली निर्मिती, संकेतात्मकता, सामूहिकता, उपदेशपरता, मौखिक परंपरा, पुनरावृत्ती, निरर्थक शब्दांची योजना, प्रश्नोत्तर स्वरुप आणि स्त्रियांमध्ये विशेष महत्त्व अशा प्रकारचे अनेक वैशिष्ट्ये उखाण्यातून दिसून येतात. उखाणे दोन चरण किंवा त्यापेक्षा अधिक चरणांचे असतात. प्रत्येक चरणाच्या अथवा दुसऱ्या -तिसऱ्या चरणाच्या शेवटी यमक साधलेला असतो . तसेच अनेक चरणाची दीर्घ रचना साकारताना पदातील चरणाच्या शेवटी यमक आणि अनुप्रास या अलंकाराचे उपयोजन केलेले दिसते.

**संदर्भ ग्रंथसूची :**

१. भागवत दुर्गाबाई - लोकसाहित्याची रुपरेखा, पृष्ठ - २३३
२. वनपर्व -अ, पृष्ठ-१३१
३ डॉ. व्यवहारे शरद - लोकवाङमयाचे स्वरुप, पृष्ठ- १९२
४. मुलाखती घेऊन संकलन केलेले उखाणे.